Loknayak 02.07.2025_Copy of Layout 1 7/1/2025 11:56 PM Page 1

बीड । जालना → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → बुधवार दि. ०२ जुलै २०२५ → वर्ष १० वे → अंक -४५ → पाने ४ → किंमत २ रु

Beed / Jalna/ → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Wednesday Date 02 July 2025 → 10 th Year → 45 th Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

बीडचा

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक -भारत गायकवाड



मी काही संदीप भैय्यांचा कार्यकर्ता नाही.. मात्र आज जे काही आमदार साहेब विधिमंडळाच्या बाहेर मिडियाशी बोलले ते १००% पटलं.. 'माझ्या खूप जवळचा माणूस गुन्हेगार आहे म्हणून मी पाठराखण करणार नाही' असं ठणकावून तत्काळ सांगायला 'जिगर' लागतं बरं का..!!

१५० दिवस गप्प राहणारा हा नेता नाही.. बजरंग बाप्पा उगाच संदीप भैय्या यांना गब्बर म्हणाले नव्हते..!! त्या अक्षय कुमारच्या गब्बर सिनेमा प्रमाणे जो चूक तो चूकच म्हणायची ताकद या नेत्यात आहे.. माझे अन संदीप भैय्यांचे अनेक विषयात मतभेद आणि मनभेद असतील मात्र आजची तुमची बाईट आवडली आमदार साहेब... यापूर्वी तुमच्या चुकांना भर सभेत अनेकदा बोललो मी मात्र चांगल्या गोष्टीची चर्चा माझ्या सारख्याने केलीच पाहिजे...

जवळचा माणूस आरोपी निघाला म्हणून त्याची बाजू न घेता कायद्याने जे काही आहे ते होऊ द्या म्हणत अगदी SIT स्थापन करण्याची मागणी असो की स्वतःचा cdr तपासण्याची मागणी सगळ्या बाबींना तयार असून अन्याय झालेल्या बहिणीच्या पाठीशी आपण उभा आहात ही मोठी गोष्ट आहे..

या जिल्ह्याने एका आदर्श सरपंचाची क्रूर हत्या पाहिली.. गुन्हेगार आपल्याच जवळचे आहेत हे माहीत असताना या हत्येवर प्रतिक्रिया देताना चष्मा स्टाईलने सारत अशा बाबी राज्यभरात सारखच घडतच असतात असं म्हणणारा एक मंत्री (आता माजी मंत्री) पाहिला आहे अनब हा दुसरा नेता जो जवळचा माणूस आरोपी आहे म्हणून त्याची पाठराखण न करता सजा द्या म्हणतोय.. हे दोन्ही उदाहरणे जनता उघड्या डोळ्याने बघत आहे..

आता यापुढं लिहावं लागेल.. न्याय समान असला पाहिजे .. मसाजोग प्रकरणात CDR तपासले गेले पाहिजेत.. कृष्णा आंधळे अटक झालाच पाहिजे.. महादेव मुंडेला न्याय मिळालाच पाहिजे... !!

धनंजय गुंदेकर, बीड

# बीड प्रकरणाचा तपास आता वरिष्ठ महिला आयपीएस अधिकारी करणार

## मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी बीड शहरात घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी केलेल्या मागणीला राज्य सरकारने २४ तासातच मान्य केले असून, या संपूर्ण प्रकरणाचा तपास आता एका वरिष्ठ महिला आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक मार्फत केला जाणार असून, याबाबतची अधिकृत घोषणा राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ सभागृहात केली आहे.**

**लोकनायक वृत्तसेवा** -बीड येथे घडलेले प्रकरण अतिशय गंभीर व माणुसकीला आणि शिक्षकी पेशाला काळीमा फासणारे आहे. या प्रकरणात अशाच प्रकारे आणखी काही मुलींचे देखील लैंगिक शोषण झाल्याची शंका नाकारता येत नाही, त्यामुळे असे प्रकार घडलेल्या मुलींनी आता स्वतःहून समोर येऊन तक्रार द्यावी, या प्रकरणाचा संपूर्ण छडा लागावा, यातील दोषी व त्यांना मदत करणारे तसेच त्यांना राजकीय किंवा सामाजिक बळ देणारे हे कोण आहेत, ते निष्पन्न व्हावेत व त्यांना कठोर शिक्षा व्हावी, ही सरकारची व नवनियुक्त डखढ समितीची भूमिका असेल, दोषी असलेल्या कुणालाही सोडले जाणार नाही, असे स्पष्ट शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

धनंजय मु ंडे यांच्या सह आज सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांनीही आज हा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. दरम्यान या तपास पथकाला कालमर्यादा निश्चित करून दिली जाणार असून, त्यांनी दिलेल्या वेळेत तपास पूर्ण करणे बंधनकारक असणार



आहे, असेही श्री फडणवीस म्हणाले. या घोषणेनंतर धनंजय मु ंडे यांनी आपण केलेली मागणी (पान २ वर)

# माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे घरफोडी

**लोकनायक वृत्तसेवा**
**माजलगाव**- दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे लोणी -सावंगी बंधाऱ्यावर ऑपरेटर च्या घरात सकाळीच घुसून घरफोडी करुन सोन्या, चांदीचे दागिने व रोख रक्कम मिळुन ६४ हजार रुपयांच्या मुद्देमालाची चोरी झाल्याची घटना घडली. चोरी प्रकरणी मिळालेली माहिती अशी, श्याम नवनाथ खैरे,लोणी-सावंगी उच्चस्तर बंधारा ऑपरेटर रा मंजरथ,ता.मंजरथ यांच्या मंजरथ येथील घरी ३०जून रोजी च्या सकाळी ११ते ११:३०वा.दरम्यान कुणी नसताना अज्ञात चोरट्याने दरवाजाचा कोंडा तोडून आत प्रवेश केला. आणि कपाटातील ७ ग्राम वजनाचे जुने वापरते सोन्याचे झुंबर, २ग्राम वजनाची नाकातील नथ,३ ग्राम वजनाची एक सोन्याची अंगठी असे मिळुन ५४ हजार रु किंमतीची १२ग्राम वजनाची सोन्याची दागिने. तसेच लहान मुलाच्या हातातील ५भार वजानाचे चांदीचे कड, ८भार वजनाचे चांदीचे जोडवे,५भार वजानाच्या ५चांदीच्या अंगठ्या,६हजार किंमतीची १८भार वजनाची चांदीचे दागिने व रोख रक्कम १०हजार रुपये चोरट्याने चोरुन नेले. श्याम खैरे यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढिल तपास सुरू आहे.

# वारोळा शिवारातील १७ गुंठे हरवलेली जमिन शोधुन द्या

## बैलासह शेतक-याचे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषण

लोकनायक वृत्तसेवा.
माजलगाव- तालुक्यातील वारोळा शिवारातील गट क्रं.३३६ मधील विजयमाला दादासाहेब जगताप यांच्या नावे असलेली १७ गुंठे जमिन हरवली असल्याचा आरोप करत सदरील जमिन शोधुन द्या या मागणीसाठी बैलासह शेतक-याने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले असुन मागण्याची दखल प्रशासनाने घेईपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याच पावित्रा शेतक-




याने घेतला आहे.
याबाबत अधिक माहिती अशी की,तालुक्यातील वारोळा शिवार गट क्र.३३६मधिल मयत दादासाहेब बाबासाहेव जगताप यांच्या नावे असलेली ५ एक्कर ३२ आर जमीन पाझर तलाव क्र.५साठी सन २००२मध्ये संपादीत झाली आहे व त्या जमीनीच्या मावेजाची रक्कम ५५लाख,७०हजार,९४५रु २८/०५/२०२५ (पान २ वर)

# वेळेची मर्यादा ११ परंतु सकाळी ४ पर्यंत टफर्फ चालू!

**लोकनायक वृत्तसेवा** - अर्ध्या रात्रीपर्यंत खेळून घराकडे जाणाऱ्या तरुणांच्या सुरक्षेचे काय ? बीडमधील टफर्फवाल्यांनो वेळ पाळा, रात्र-रात्र खेळायला लावून नुसते पैसे कमवायचे बघू नका !
पोलीस प्रशासनाने त्यांनाही वेळेचे बंधन लावावे - परशुराम गुरखुदे
शहरात सध्या टफर्फ मैदानाची संख्या वाढत आहे. लहान, मोठ्या खेळाडूंसाठी ही बाब चांगली असली तरी काही टफर्फ रात्री उशिरापर्यंत चाल-तात. सकाळपासूनच खेळाडू आपल्या ग्रुपप्रमाणे नोंदणी करतात. वेटींग नुसार रात्री उशिरापर्यंत त्यांचे नंबर येतात.



रात्री १२ वाजता नंबर आला तर मध्यरात्री २ ते ३ पर्यंत तरुण खेळतात
आणि तिथून पुढे घराकडे जातात. अशावेळी त्या तरुणांच्या सुरक्षेचे काय ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. त्यामुळे बीडमधील टफर्फवाल्यांनी, वेळा पाळणे आवश्यक (पान २ वर)



**लोकनायक वृत्तसेवा - लोकनेते सुंदररावजी सोळंके कारखान्याचे चेअरमन तथा कृऊबासचे संचालक वीरेंद्र सोळंके यांनी नुकताच ब्राझील दौऱ्यात ऊस पिक पाहणी व कारखाना विषयक अभ्यास दौरा केल्यानंतर माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने त्यांचा सत्कार केला यावेळी सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे संचालक सर्व श्री नितीनराव नाईकनवरे,प्रभाकर होके,आसाराम घायतीडक,डॉ उद्धव नाईकनवरे, नंदकिशोर सजगणे,अमोल जाधव, आबाजी भोसले, जुगलकिशोर नावंदर, भगवान आगे, कदिर खाँ पठाण सचिव हरिभाऊ सवणे**

# बेकायदेशीर रित्या अग्नी शस्त्र बाळगाणाऱ्या तीन इसमांना शिवाजीनगर पोलीसांनी केले जेरबंद

**लोकनायक वृत्तसेवा** -
दिनांक ०१/०७/२०२५ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील धानोरा रोड, बीड या ठिकाणी पांढ-या रंगाची ह्युडांई दउएछढ गाडी क्र. चक ०५ इग १९८८ मध्ये दोन इसम अग्निशस्त्र ताब्यात बाळगुन घेवुन जात आहेत अशी गोपनीय माहिती शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार यांना मिळालेने



सदर बातमीचे अनुषंगाने खात्री करुन कारवाईकामी तात्काळ पोलीस ठाणे स्थरावर पथक तयार करुन रवाना केले होते.नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे धानोरा रोडवरील पंढरी कॉलनी समोर सापळा रचुन थांबलेले असतांना पांढ-या रंगाची ह्युडांई दउएछढ गाडी क्र. चक ०५ इग १९८८ आल्याने सदर गाडी अडवुन त्यामध्ये दोन इसम १) आमोल कल्याण पवार वय २९ वर्षे रा. घोडका राजुरी ता.जि. बीड ह.मु. बार्शी (पान २ वर)

# शेतकरी मारहाण प्रकरणी उबठाचे उपनेते सचिन घायाळ यांच्यावर गुन्हा दाखल; शेतकऱ्यात तीव्र संताप

**पैठण लोकनायक वृत्तसेवा** -
उसाचे पैसे घेण्यासाठी घरी गेलेल्या शेतकऱ्याला शिवीगाळ करुन लाताबुक्याने डोक्यात लाकडी दांड्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सचिन घायाळ शुगरचे चेअरमन तथा शिवसेना उबाठा गटाचे उपनेते सचिन घायाळ व अन्य तीन जणांविरुद्ध पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीसांनी दिलेल्या



माहितीनुसार ऊसाचे बील घेण्यासाठी सचिन घायाळ शु-गरचे चेअरमन सचिन घायाळ यांनी राहुल कांबळे यास उसाचे बिल घेण्यासाठी घरी बोलावून घेतले व पैसे देत नाही तुला काय करायचे ते कर असे म्हणुन डोक्यात लाकडी दांड्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात ठाकरे गटाचे उपनेते सचिन घायाळ अन्य तीघांवर कलम ११८(१), ११५,३५२,३५१(२),३(५) इछड नुसार १) सचिन विक्राम घायाळ २) अमोल सुदाम घायळ ३) सुनिल सुदाम घायाळ ४) रविंद्र हरिचंद्र थोटे सर्व (पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

प्रोप्रा.नरेंद्र करमाळकर
मो.नं.९४२०७९८९२९
निलेश करमाळकर
मो.नं.९८२२४४८८५२



न्यु करमाळकर ज्वेलर्स
Since1999
G.S.T.N. No.27BKAPK8972L2ZI
बुंदलेपुरा, अग्नीशामक रोड, बीड ४३११२२

Loknayak 02.07.2025_Copy of Layout 1 7/1/2025 11:56 PM Page 2



# आषाढी महोत्सव शुभ पर्वावर पैठणच्या संतपीठासाठी निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी करावी - वारकऱ्यांची मागणी

**लोकनायक वृत्तसेवा** – पैठणच्या दक्षिण काशीत महाराष्ट्र शासनाने मराठवाडाच्या विकासाच्या ४२ कलमार्तगत संतपीठ उभा करण्याची घोषणा करून मागील काही वर्षांत वारकरी संघटनेसह सामाजिक संघटनांनी आंदोलने केली आहेत. त्यामुळे सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्याकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे.संतपीठासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणीही विद्या- पीठाकडून करण्यात आ- पडले आहे.

महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे आराध्य दैवत पांडुरंगाचा आषाढी महोत्सव साजरा करण्यासाठी संत-महंत व वारकरी येत्या दि.६ रविवारी पंढरपूर क्षेत्री




जवळपास ३५ वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे. संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील जागेत संतपीठ सर्व सुविधा युक्त १७एकर जागेत पुर्ण क्षमतेने उभा करण्यासाठी ची कार्यवाही अतिशय मंद गतीने चालू आहे. संतपीठ त्वरित सुरू करण्यात यावे म्हणून मार्गदर्शनाखाली संतपीठाचे प्राथमिक कामकाज प्रशासकीय इमारतीतून सुरू केले आहे. सद्यस्थितीत संत परिचय हा एकमेव अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. कै.थोर साहित्यिक बाळासाहेब भारदे समितीने संतपीठाच्या अभ्यासक्रमाबाबत सविस्तर लेली आहे. त्याचीही शासनाने गंभीर दखल घ्यावी. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने ही संतपीठाच्या सर्व इमारती बांधकामासाठी निधीची मागणी केली आहे. मात्र आजही पैठणच्या संतपीठाच्या विकासाचे रणगाडे भिजत लाखोंच्या संख्येने जमणार आहेत. या शुभ पर्वावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पैठणच्या संतपीठ उभारणीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा करावी अशी मागणी वारकऱ्यांनी केली आहे.

# रेल्वेच्या खदानीतुन पैशाचा पडतो पाऊस

**लोकनायक वृत्तसेवा** – वर्धा यवतमाळ नांदेड नवनिर्मित रेल्वे विकास प्रकल्पाच्या उत्खननातील गौण खनिज इतरत्र खुल्या बाजारात विक्री करून दर दिवशी लाखो रुपयाचा शासनाचा महसूल बुडविला जाऊन कंत्राटदार व महसूल विभागातील काही भ्रष्ट अधिकारी दर दिवशी लाखो रुपयांची कमाई करीत असल्याबाबतच्या तक्रारी संबंधित विभागाला दिलेल्या असून यातील तक्रारदार यांची गेल्या सहा महिन्यापासून ईटीएस मोजणीची तक्रारीद्वारे केलेली मागणी महादेव जोरवर, विद्यमान तहसीलदार पुसद हे जाणीवपूर्वक टाळत आहेत हे स्पष्ट दिसत आहे त्याकरिता 'आमरण उप- ोषण आंदोलनाचा' इशारा देखील तक्रारदाराने दिलेला आहे.

सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार प्रख्यात व्हिसल ब्लोअर अमोल कोमावार यांनी दिग्रस उमरखेड व पुसद तालुक्यात हद्दीत व अधिकार क्षेत्रात चालू असलेल्या विकास कामाच्या नावावर अवैधपणे उत्खनन याबाबत तात्काळ इ टी एस मोजणी करून कारवाई करण्याची तक्रार दिलेली होती. परंतु गेल्या सहा महिन्यात तक्रारी स्मरणपत्रे पाठपुरावा करून सुद्धा कारवाई होत नसल्याकारणाने शेवटी न्याया करिता 'अन्नत्याग आमरण उपोषण 'आंदोलनाचा इशारा दिलेला आहे.



विश्वसनीय सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार पुसद व उमरखेड परिसरातील नैसर्गिक संपत्ती खु- लेआम नष्ट करून लाखो रुपयाची कमाई करणाऱ्या कंत्राटदारांकडून संबंधित भ्रष्ट महसूल कर्मचारी/ अधिकाऱ्यांना दर महिन्याला लाखो रुपयाची लाच दिल्या जाते. संपूर्ण महसूल वतुर्ळात सध्या उमरखेड पुसद येथील ' रेल्वेच्या खदानीतून पैशाचा पाऊस पडतो' अशा कोडवर्ड मध्ये चांगलीच गरमागरम चर्चा चालत आहे. त्यामुळेच पुसद व उमरखेड येथे पद घेण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून हालचाली करून मोठा आर्थिक व्यवहार केल्या जातो. वाटेकरी जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ पर्यंत असून यामध्ये मंत्री महोदय सुद्धा शामिल असल्याची चर्चा आहे. त्यानुसार यातील तक्रारदार प्रख्यात व्हिसल ब्लोअर अमोल कोमावार यांनी यापूर्वी दिलेल्या तक्रारीनुसार आज पर्यंत गेल्या पाच वर्षापासून सतत पाठपुरावा



करून कळंब ते यवतमाळ पर्यंत रेल्वे विकास कामात अंदाजे १२००० करोड रुपयाचा गौण खनिज भ्रष्टाचार उघडकीस आणलेला असून याबाबत मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका सुद्धा दाखल असून केंद्रीय रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांवर गेल्या चार वर्षापासून सीबीआय चौकशी चालू आहे. यातील कंत्राटदार आर बी आर कन्स्ट्रक्शन चे मालक आर. भरत रेडी यांच्यावर फौजदारी खटले तसेच रेल्वे न्यायालयातून सक्तीची वसुली करण्याचे आदेश दिल्या गेले आहेत. तसेच यातील उपकंत्राटदारावर व संबंधित राज्य शासनाच्या महसूल अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी न्यायालयीन प्रक्रिया तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मंत्रालय मुंबई येथून चौकशी चालू आहे.

'सध्या पुसदच्या रेल्वे खदानीतून पाऊस पडत आहे 'ही बातमी वाऱ्यासारखी पावसाळी अधिवेशनात गाजत असून या बातमीमुळे सर्वांचे लक्ष वेधले गेलेले आहे तसेच यातील तक्रारदार प्रख्यात विसरलोर अमोल कोमावार यांच्या 'अन्नत्याग आमरण उपोषणामुळे ' सरकारी अधिकारी व संबंधित इतरांमध्ये हडकंप सुटलेला दिसत आहे. त्यामुळे यावर काय कारवाई होईल याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## पान १ वरून

**बीड प्रकरणाचा...**

राज्य सरकारने २४ तासांच्या

आत मान्य केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच उपुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले असून, या प्रकरणातील पीडितांना न्याय मिळेपर्यंत आपण हे प्रकरण लावून धरू असा निर्धार मु ंडेंनी व्यक्त केला आहे

**वारोळा शिवारातील...**

रोजी उपविभागीय अधिकारी यांनी आदेश काढून वितरीत करण्यात आली. परंतु सदर मावेजा मध्ये विजयमाला दादासाहेब जगताप या मयत दादासाहेब जगताप यांच्या पत्नी असून सुध्दा मावेजाच्या वारसात त्यांचे नाव नाही व तसा रक्कमेचा लाभ त्यांना मिळालेला नाही व त्याच ३३६ गटातील मयत दादासाहेब बाबासाहेब जगताप यांच्या नावावर असणारी ५ एक्कर ३२ आर जमीनीमध्ये १७ गुंठे जमीन ही विजयमाला जगताप यांच्या नावावर आहे. परंतु सदर संचिकेच्या आवार्ड मध्ये विजयमाला दादासाहेब जगताप यांचे वारस म्हणून नाव नाही,मावेजाची रक्कम मयत दादासाहेब बाबासाहेब जगताप यांचे वारसदारांना वितरीत करण्यात आली.

सध्या पेरणीचे दिवस जवळ आले असुन या १७ गुंठे जमीनीमध्ये पेरणीची मशागत करण्यासाठी ही जमीन विजयमाला दादासाहेब जगताप यांचे वारस आनंत दादासाहेब जगताप यांना मिळवून द्यावी या मागणीसाठी बैलासह उपोषण सुरु करण्यात आले आहे.

**वेळेची मर्यादा...**

आहे. रात्र रात्र खेळायला लावून नुसते पैसे कमवायचे बघू नये. तुमच्याकडे खेळायला येणाऱ्या शाळकरी मुलांसह तरुणांची सुरक्षा देखील महत्वाची आहे. दरम्यान पोलीस प्रशासनाने शहरातील सर्व टफर्फ धारकांसाठी नियमावली तयार करावी.

**बेकायदेशीर रित्या...**

नाका, (२) बाबुराव मन्मथ वैराळे वय ३३ वर्षे रा. कदमवाडी ता.जि. बीड मिळुन आले. त्यावेळी नमुद दोन्ही इसमांची अंगझडती घेतली असता अंगझडतीत इसम नामेबाबुराव मन्मथ वैराळे याच्या कमरेला एक गावठी बनावट लोखंडी पिस्टल ज्यास मॅग्जीन असलेला जु.वा.किं. ५०,०००/- रु. असा मिळुन आल्याने सदरचा गावठी पिस्टल व गुन्ह्यात वापरलेली पांढ-या रंगाची ह्युडांई दउएछढ गाडी क्र. चक ०५ इग १९८८ जप्त करण्यात आली. आरोपीनां पिस्टल विक्री करनारा इसम ३) राहुल प्रकाश तुपे रा. आशा टॉकीज धानोरा रोड बीड यास त्याच्या राहते घरुन ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपी राहुल प्रकाश तुपे हा मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाने बीड जिल्हातुन तडीपार असुन त्यावर तो तडीपारीच्या काळात बीड जिल्हात मिळुन आल्याने त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यातील आरोपी क्र.१) आमोल कल्याण पवार यांचे विरुध्द बीड जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी क्र. (२) बाबुराव मन्मथ वैराळे याचे विरुध्द जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०२ गुन्हे दाखल असुन आरोपी क्र.३) राहुल प्रकाश तुपे याच्यावर वेगवेगळ्या पो- लीस ठाण्यात एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपींवर दाखल असलेले गुन्हे हे गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्द चे गुन्हे तसेच अवैघ शस्त्र बाळगने अशा प्रकारचे आहेतयातील आरोपी क्र.१) आमोल कल्याण पवार यांचे विरुध्द बीड जिल्ह्यातील वेग- वेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी क्र. (२) बाबुराव मन्मथ वैराळे याचे विरुध्द जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०२ गुन्हे दाखल असुन आरोपी क्र.३) राहुल प्रकाश तुपे याच्यावर वेग- वेगळ्या पोलीस ठाण्यात एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपींवर दाखल असलेले गुन्हे हे गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्द चे गुन्हे तसेच अवैध शस्त्र बाळगने अशा प्रकारचे आहेत.

सदरची कारवाई मा. पो- लीस अधीक्षक श्री. नवनित कॉंवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड कमलेश मिना साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली शिव- ाजीनगर पोलीस ठाणेचे पो- लीस निरीक्षक श्री. किशोर पवार, सपोनि / संदिप दुनगहु, सपोनि/गजानन क्षिरसागर, ग्रे.पो.उप.नि./ अब्दुलखय्युम कुरेशी, पो- हवा/१६६४ रविद्र आघाव, पोना/४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/३०५ दिलीप राठोड, पोशि/६१७ अशोक राडकर, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/९०४ लिंबाजी महानोर, पोशि/५११ अभिजीत सानप, पोशि/४८५ विलास कांदे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/ज्ञानेश्वर धोत्रे हे करत आहेत.

**शेतकरी मारहाण...**

रा.पैठण ता. पैठण याच्यावर गुन्हा पैठण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी संत एकनाथ सचिन घायाळ शुगर कारखान्याला ऊस दिलेला असुन चार ते पाच महिन्यांपासून शेतकऱ्यांना ऊसाचे बील देत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकरी ऊसाचे बील मागण्यासाठी जात असताना परंतु सचिन घायाळ हे शेतकऱ्यांना शिवीगाळ केल्याच्या अनेक तक्रारी त्यांच्या विरोधात दाखल झालेल्या आहेत. शेतकऱ्यांना व नामंकीत दैनिकाच्या पत्रकाराला धमकी दिल्याप्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल आहे. तर नव्याने ठाकरे गटाचे उपनेते पद मिळालेल्या सचिन घायाळ यांनी शेतकऱ्याला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार घडल्यामुळे तालुक्यात संताप व्यक्त करण्यात येत आहे. तर आशा नेत्याची पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## पान ४ वरून

**समाजातील प्रत्येक घटकाला फायदा**

प्रत्येक समाज घटकाला फायदा व्हावा असा प्रयत्न राहीला. बीड जिल्हा संवेदनशील जिल्हा आहे.धार्मिक वृत्ती जोपासणात वसा आणि वारसा चाल- वणारा जिल्हा आहे.यावेळी शाळेचे उप मुख्याध्यापक बेगसर, मुख्य लिपिक सचिन भोज,पर्यवेक्षक अमरापुरकर पर्यवेक्षक प्रा.गाडेकर प्रा. सिध्देश्वर तसेच सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित हो ते

**माजलगाव तालुक्यातील मंजरथ**

हातातील ५भार वजनाचे चांदीचे कड, ८भार वजनाचे चांदीचे जोडवे,५भार वजनाच्या ५चांदीच्या अंगठ्या,६हजार किंमतीची १८भार वजनाची चांदीचे दागिने व रोख रक्कम १०हजार रुपये चोरट्याने चोरुन नेले. श्याम खैरे यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढिल तपास सुरू आ हे.

**भाऊ' म्हणून ओळखले जाणारे पोलीस**

ङ्गभाऊङ्घ म्हणून संबोधत असत.सेवानिवृत्तीनंतर ही श्री. वाघमारे सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याचा मानस व्यक्त केला असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ समाजाला व पुढच्या पोलीस पिढीला होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**संपूर्ण ग्रामविकास हेच**

घोडके, श्रीकांत लुंगारे, श्री.सुजित नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी उप- स्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी डॉ. कराळे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राच्या कृषीचा अत्यंत सखोल अभ्यास असणारे आणि त्या दृष्टीने जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे कृतीशील सुधारक म्हणजे वसंतराव नाईक हे असल्याचे सांगितले.

यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते.

**पतीनंतर पत्नीचेही निधन**

दुपारी येवून मयताच्या अस्थी सावडून अंत्यविधीचा खर्च दिला. या घटनेनंतर मात्र अपंग वृद्ध महिलेच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला. इसमाच्या मृत्यूस जेमतेम ५२ दिवस उलटत नाहीत तोच सदर अपंग वृद्ध महिला आजारी असल्याचे कळाले. व्यापारी संघटनेचे अध्यक्ष आशोक जाधव यांनी तात्काळ अमर महामुनी यांना सदर महिलेस उपच- ारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यासाठी मार्गदर्शन केले. तर पत्रकार सय्यद शाकेर, दिनेश कापसे यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांना सदर वृद्ध महिलेच्या मदतीसाठी विनंती केली. येथील ग्रामीण रुग्णालयात सदर महिलेस अमर महामुनी, अनंत चिंचाळकर यांनी दाखल केले. वैद्यकीय अधिक्षक डॉ. परदेशी यांनी उपचार केले. मात्र काही वेळातच वृद्ध महिलेने प्राण सोडले. यानंतर यापुर्वीप्रमाणेच या महिलेवरही अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सुवर्णकार समाजाचे अमर महामुनी, अनंतराव चिंचाळकर, राजेभाऊ महामुनी, श्रीकांत बारस्कर, निखिल चिंचाळकर, धीरज चिंचाळकर, प्रमोद पंडित, किशोर महामुनी, सतीश पोद्दार, संतोष पोतदार आदी सोनार बांधव, नगर परिषद कर्मचारी उपस्थित होते. अंत्यसंस्कारासाठी मुख्याधिकारी गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

लोकनायक

बुधवार दि. ०२ जुलै २०२५



# महसूल व वन विभाग तहसील कार्यालय जामखेड व ग्रामीण विकास केंद्र जामखेड यांच्या वतीने विविध योजनांचा व नागरिकत्वाच्या पुराव्याचे वाटप

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व भारतीय संविधान प्रास्ताविकेला मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून सुरुवात

**लोकनायक वृत्तसेवा –** महसूल व वन विभाग तहसील कार्यालय जामखेड व ग्रामीण विकास केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान जगदंबा लॉन्स खर्डा रोड जामखेड या ठिकाणी घेण्यात आले शिबिर कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व भारतीय संविधान प्रास्ताविकेला मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून सुरुवात करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे विनोद लोंढे साहेब सहाय्यक आयुक्त इतर मागास अहिल्यानगर नितीन पाटील साहेब उपविभागीय अधिकारी कर्जत गणेश माळी साहेब तह–सीलदार जामखेड व ॲड.डॉ.अरुण आबा जाधव संस्थापक अध्यक्ष ग्रामीण विकास केंद्र जामखेड उपस्थित होते या मान्यवरांचे महसूल व वनविभाग तहसील कार्यालय जामखेड व ग्रामीण विकास केंद्र यांच्या वतीने स्वागत करून सन्मान करण्यात आला.. छत्रपती शिवाजी महाराज व महाराजस्व समाधान शिबिरामध्ये विविध विभागाचे एकूण १८ सेवांचे लाभाचे वितरण करण्यात आले सदर शिबिरास अंदाजे ८०० महिला व पुरुष उपस्थित होते या शिबिरास जामखेड तालुक्यातील भटके विमुक्त समाजातील जाती–जमातींना जास्तीत जास्त लाभ वितरण करण्यात आले आहे. विविध योजना लाभार्थींची आकडेवारी

जात प्रमाणपत्र १८६,भटके विमुक्त समाजातील भटकंती करणाऱ्या कलाकार नागरिकांना ओळखपत्र २००,मतदान




ओळखपत्र २०, शिधा पत्रिका १००,विशेष सहाय्यक विभाग यांचे निराधार व्यक्तींना लाभ वितरण ४९, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना लाभ वितरण ३, नैसर्गिक आपत्तीमुळे पशुधनाची नुकसान अनुदान वितरण ४,जिवंत ७/१२ अंतर्गत वारस फेरफार व गाव नमुना ७/१२ वाटप ५९,गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजना वारसांना लाभ कृषी विभाग ८, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना लाभ वितरण पंचायत समिती १६,जिल्हास्–तरीय विशेष घटक योजना पंचायत समिती जामखेड ४,दूध काढणी यंत्र वाटप मंजुरी वितरण पंचायत समिती जामखेड ६,मुक्त संचार गोठा लाभ वितरण ४,नगरपरिषद घरकुल लाभ वितरण प्रधानमंत्री आवास योजना शहरी ४६, बेबी केयर किट वाटप लाभार्थी व लेक लाडकी योजना लाभार्थी एकात्मता महिला बालविकास विभाग ८,दिव्यांग युनिक आयडी वाटप ३ ग्रामपंचायत खर्डा यांच्यावतीने मालमत्ता पत्रक वाटप ९ रो.ह.यो.अंतर्गत जॉब कार्ड २५ इत्यादी शासनाच्या विविध विभागाच्या योजनांचे लाभ वितरण एका छताखाली या शिबिराच्या निमित्ताने लाभधारकांना मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले आहे. यावेळी नितीन पाटील साहेब उपविभागीय अधिकारी कर्जत म्हणाले की जातीच्या दाखल्यावाचून कोणीही वंचित राहणार नाही महाराष्ट्र शासनाचा लाभ खरंतर लाभार्थ्यांनी घेतला पाहिजे आजचे शिबिर लाभार्थ्यांच्या हिताचे आहे जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनाचा लाभ घ्यावा असे पाटील साहेब म्हणाले व विनोद लोंढे साहेब सहाय्यक आयुक्त इतर मागास अहिल्यानगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व ॲड.डॉ.अरुण आबा जाधव म्हणाले की भटके विमुक्त समूहाला महाराष्ट्र शासनाची प्रत्येक योजना त्यांच्या पाला पर्यंत पोहोचवणार व या योजनेपासून कुणीच वंचित राहणार नाही ग्रामीण विकास केंद्र संस्थेच्या वतीने या गोर–गरीब जनतेला योजनेचा लाभ मिळवून दिला देणार आहे व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश माळी तहसीलदार जामखेड यांनी केले

यावेळी तहसील कार्यालय जामखेड पूर्ण कर्मचारी व पदाधिकारी गट विकास अधिकारी मुख्याधिकारी तालुका कृषी अधिकारी तालुका आरोग्य अधिकारी महिला व बालविकास अधिकारी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उपअधीक्षक भूमी अभिलेख उपस्थित होते व ग्रामीण विकास केंद्र संस्थेचे संचालक बापू ओहोळ विशाल पवार संतोष चव्हाण सचिन भिंगारदिवे ऋषिकेश गायकवाड राजू शिंदे रजनी बागवान उर्मिला कवडे मनीषा शिंगाने ललिता पवार सर्व ग्रामीण विकास केंद्र संस्थेचे कर्मचारी उप–स्थित होते..

# आ. रोहित पवार यांना जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये धक्का

## जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती कैलास वराट यांच्या विरुद्ध अविश्वास ठराव

**लोकनायक वृत्तसेवा –** कृषी उत्पन्न बाजार समिती जामखेड ता. जामखेड चे विद्यमान उप सभापती श्री. कैलास वराट हे बाजार समितीच्या सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी पध्दतीने कामकाज करीत असल्याची तक्रार करीत बाजार समितीच्या बारा सदस्यांनी उप सभापतींविरोधात अविश्वास ठराव दाखल केला असून त्यांना पदावरुन दूर करण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर

डॉ. पंकज आशिया यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी – विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या नियमानुसार, जिल्हाधिकारी यांना असे पत्र प्राप्त झाल्यानंतर, पंधरा दिवसांच्या आत समिती विशेष सभा आयोजित करून या विषयावर समिती सदस्यांच्या मतदानाद्वारे निर्णय घेण्याबाबतची



तरतूद आहे.

जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना यासंदर्भात दिलेल्या निवेदनावर संचालक सर्वश्री शरद कार्ले (सभापती),

सचिन घुमरे, नंदकुमार गोरे, अंकुश ढवळे, विष्णु भोंडवे, गौतम उतेकर, गणेश जगताप, वैजीनाथ पाटील, बेदमुथ्था राहुल सुरेश, हलगुंडे रविंद्र शिवराम, ससाणे सिताराम चिमाणी, नारायण तुकाराम जायभाय अशा बारा जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना दिलेल्या निवेदनात उप सभापती यांचा मनमानी पध्दतीने कारभार, संचालकांनी सुचविलेल्या शेतकरी हिताच्या आणि बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होईल अशा सूचनांकडे दुर्लक्ष करणे याबाबींकडे लक्ष वेधण्यात आले आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती श्री.शरद कार्ले यांनी दिली.

# विजेचा धक्का लागून चिमुकल्याचा मृत्यू,आठ दिवसातील तिसरी घटना

**लोकनायक वृत्तसेवा –** क्रिकेट खेळताना स्लॅपवरती गेलेला बॉल फ्लेक्सच्या लोखंडी पाईप ने काढत असताना घराजवळील मुख्य विज वाहीनीचा शॉक लागुन १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.

ही घटना जामखेड शहरातील खर्डाचौका जवळील टेकाळे नगर या ठिकाणी घडली. विजेच्या तारांना चिकटून मृत्यू झालेली ही आठ दिवसांतील तिसरी घटना आहे.याबाबत अधिक माहिती अशी की जामखेड शहरातील खर्डा चौकातील टेकाळे नगर या ठिकाणी सोमवार दि ३० जुन रोजी सायंकाळी साडेपाच वाजता प्रणव प्रशांत टेकाळे, वय १२, वर्षे रा. टेकाळे नगर हा आपल्या मित्रांनसोबत घराजवळ क्रीकेट खेळत होता. प्रणव टेकाळे याच्या घराजवळुनच मुख्य विद्युत वाहीनीच्या तारांची लाईन गेली आहे. क्रिकेट खेळत असताना बॉल स्लॅपवरती गेला या जवळच मुख्य विजेच्या तारा होत्या. प्रणव याने फ्लेक्सचा लोखंडी पाईप सदरचा बॉल काढण्यासाठी घेतला व बॉल काढत असताना त्याच्या हातातील पाईपचा या लाईटच्या तारांना धक्का लागला व त्याचा मृत्यू झाला. यावेळी त्याठिकाणी असलेले त्याचे चुलते नातेवाईकांनी त्याला तातडीने रुग्णालयात नेले मात्र पुर्वीच त्याचा मृत्यू झाला. जामखेड पोलीस स्टेशनला याची खबर मयूर टेकाळे यांनी दिल्याने जामखेड पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

शहरातील सदाफुले वस्ती येथील टेकाळे नगर येथे विजेचा तारेला स्पर्श होऊन प्रणव टेकाळे वय १२ वर्षीय या बालकाचा मृत्यू झाला आहे. हि घटना संपूर्ण शहरात पसरली होती. पण



महावितरणच्या अधिकाऱ्यांना काहीही माहिती नव्हते. घटनेनंतर तीन तास झाले तरीही कोणीही महावितरणचे अधिकारी घटनास्थळी गेले नव्हते.

आठ दिवसात तिघांचा मृत्यू

मागिल आठ दिवसापूर्वीच जामखेड तालुक्यातील बाळ–गव्हाण येथील उसाच्या शेतात खत टाकण्यासाठी गेलेल्या बाप– लेकाचा शेतातील खाली पडलेल्या विजेच्या तारांना चिकटून जाग्यावरच मृत्यू झाला होता.

विद्युत महामंडळाच्या गलथान कारभारामुळे या दोघांचा मृत्यू झाला असल्याचे ग्रामस्थांन कडुन बोलले जात होते. यानंतर खर्डा– बाळगव्हाण येथील वायरमन यांना दोषी ठरवुन मनुष्यवधाचा

गुन्हा दाखल करण्यात आला होता. विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची जामखेड तालुक्यातील येत्या आठ दिवसातील ही तिसरी घटना आहे. मागिल आठ दिवसात विजेच्या तारांना चिकटून तिघांचा मृत्यू झाला आहे.

# निलेश राठौर यांनी रक्तदान करून आपला वाढदिवस साजरा केला

**लोकनायक वृत्तसेवा –** द्वारकादास मंत्री सहकारी बँकचे मुख्य शाखा येथील खजांची म्हणून कार्य करणारे निलेश कुमार राठोर यांनी रक्तदान करून आपला वाढदिवस साजरा केला. त्यांच्या या रक्तदानाने अनेकांना नवीन जीवन मिळालेले आहे. वाढदिवसासाठी वायफळ खर्चाला फाटा देऊन समाज उपयोगी रक्तदानाचे कार्य करून त्यांनी एक नवीन आदर्श समाजासमोर ठेवला आहे. २३ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. ते स्वतःब्लड बँकेत जाऊन रक्तदान करतात. त्यांच्या या सामाजिक कार्याने प्रेरित होऊन त्यांचे मित्र



परिवार ही ठिकठिकाणी जाऊन रक्तदान करीत आहे. त्यांनी बलभीम महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना रक्तदान शिबिराचे आयोजन ही केलेले होते. रक्तदान हेच रक्तदान हेच श्रेष्ठ दान असा संदेश त्यांनी समाजासमोर ठेवला आहे त्यांच्या या कार्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे यामध्ये द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक चे वरिष्ठ अधिकारी.

जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत ,अंजली नाईकवाडे ,महाराष्ट्र प्रांतीय राठोड क्षत्रिय समाज चे सर्व पदा अधिकारी

यांनी भ्रमण ध्वनीद्वारे त्यांचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा प्रदान केले आहे.

# युवा नेते वसीमभाई (बिल्डर) कुरैशी यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न,विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप

**लोकनायक वृत्तसेवा –** जामखेड शहरातील सामाजिक कार्यकर्ते युवा नेते वसीमभाई (बिल्डर) कुरैशी मित्र परिव–ाराच्या वतीने खर्डा चौक जवळील रेस्ट हाऊस येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या भव्य रक्तदान शिबिरामध्ये १४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून मोलाचे विशेष सहकार्य केले आहे.जामखेड शहरातील युवा नेते सामाजिक कार्यकर्ते वसिमभाई (बिल्डर) कुरैशी यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.तसेच त्यांच्या चालू वर्षीच्या वाढदिवसानिमित्त गोरगरीब व वंचित विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटपही करण्यात आले.

यावेळी बोलताना विविध मान्यवरांनी सांगितले की,वसिमभाई (बिल्डर) कुरैशी हे नेहमीच सामाजिक सलोख्यासाठी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करीत




असतात.समाजात सामाजिक एकोपा कसा राहिल यासाठी त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो.उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाई वाटप करण्यात आले.तसेच वसिमभाई बिल्डर मित्र मंडळ व जनकल्याण रक्तकेंद्र अ.नगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते विकी सदाफुले म्हणाले की,वसीमभाई बिल्डर यांचा वाढदिवस दरवर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो,नेहमीच जातीय सलोखा व सामाजिक सलोखा राखण्यासाठी



वसीमभाई (बिल्डर) कुरैशी हे नेहमीच प्रयत्नशील असतात.यावर्षी रक्तदान शिबीर व शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले आहे.यावेळी बोलताना अन्सार पठाण म्हणाले की,सामाजिक कार्यकर्ते वसिम बिल्डर हे आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करतात.ते नेहमी गोरगरीबांना मदत करण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर असतात.यावेळी विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी सामाजिक कार्यकर्ते विकी भाऊ सदाफुले,जामखेड तालुका डॉक्टर असोसिएशनचे डॉ सादेक पठाण,डॉ.प्रशांत गायकवाड,डॉ.प्रदिप कुडके,डॉ.फारूक शेख,डॉ.विकी दळवी,उमर कुरेशी तालुका

अल्पसंख्याक अध्यक्ष,

जमीरभाई सय्यद,मोहसिन कुरेशी,हाजी अस्लम शेख,जमीर शेख,फारूक कुरेशी,नजीर

कुरेशी,तय्यब सय्यद,सलमान सय्यद तसेच वसीमभाई (बिल्डर) मित्र मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येंने उपस्थित होते.

**सुचना**
दैनिक **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्द्ल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
पान ४
बुधवार दि. ०२ जुलै २०२५




# समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम संस्थेने केले-माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

**स्वर्गीय काकूंनी लावलेल्या लहान रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे या वृक्षाच्या छत्रछायेखाली तेव्हापासून हजारो कुटुंबांना आधार मिळाला आणि यापुढे मिळत राहील संस्थेने सर्व जाती धर्माला प्राधान्य दिल्यामुळेच या संस्थेत गुणवंत विद्यार्थी घडले आहेत सामाजिक बांधिलकी जोपासणारी ही संस्था समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम करत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे**



**लोकनायक वृत्तसेवा** – विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील महादेव जाधव यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती तर व्यासपीठावर डॉ.लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड, शिक्षणाधिकारी विक्रम सारूक, नानासाहेब काकडे, हर्षद क्षीरसागर, सुभाष क्षीरसागर, उषाताई सरवदे, विजय सरवदे, सतिष काटे, मकबूलभाई, सुधाकर मिसाळ, एम.बी.सानप, मौलाना काझी महंमद, सहाय्यक प्रशासकिय अधिकारी योगेश पवार, किर्तीताई पांगारकर, इंजि.देशमाने आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमात प्रास्ताविक आशा हंडिबाग यांनी केले तर लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले .ावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,गेल्या ३५ वर्षे ज्ञानदानाचे काम करून संस्थेत प्रमाणिकपणे काम करणारे जाधव भटक्या विमुक्त समाजात जन्मलेला एक तरूण उच्च शिक्षण घेवून उत्तम काम करू शकतो आणि सेवा करू शकतो असे लोक संस्थेला मिळाले. शिवाजी पाटोळे याने स्व.काकूंपासून सेवा केली. संस्थेने सेवेत घेताना जात-पात, धर्म कधीच बघीतला नाही, गुणवान लोकांना संधी देवून संस्थेने गुणवान विद्यार्थी घडवले. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत हे बदल स्वीकारत छोट्या रोपट्याने वटवृक्षात रूपांतर केलं आहे. अनेक अडचणीवर मात करत सामाजिक बांधीलकी जोपासत संस्थेचा **पान २ वर**

# भाऊ' म्हणून ओळखले जाणारे पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक गौतम भानुदास वाघमारे सेवानिवृत्त



**लोकनायक वृत्तसेवा** – पोलीस खात्यात ३३ वर्षांहून अधिक काळ कर्तव्यपरायण, शिस्तबद्ध व समाजाभिमुख सेवा बजावलेले पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक गौतम भानुदास वाघमारे, जे 'भाऊ' या नावाने विभागात तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये ओळखले जात होते, हे दिनांक ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमात त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.श्री. वाघमारे यांनी आपल्या सेवाकाळात सिटी पोलीस स्टेशन बीड, ग्रामीण पोलीस स्टेशन बीड, नेकनूर, गेवराई, वडवणी, तसेच लिंबागणेश चौकी येथे सेवा बजावली. त्यांच्या कार्यातील प्रामाणिकपणा, कठोर मेहनत आणि लोकाभिमुख दृष्टिकोन यामुळे त्यांना विविध कामगिरीबद्दल एकूण ४३ पदकांनी सन्मानित करण्यात आले. ही त्यांच्या सेवेतील उत्कृष्टतेची व निष्ठेची ठळक पावती मानली जाते.सेवेदरम्यान त्यांनी अनेक उध्वस्त संसार पुन्हा थाटले, कौटुंबिक वाद मिटवले,हे कार्य केवळ पोलिसिंगपुरते मर्यादित न राहता मानवी मूल्यांची जपणूक करणारे होते.आणि पोलीस खात्याचा एक सहृदय चेहरा लोकांपुढे ठेवला. त्यांच्या सुसंवाद व माणुसकीच्या दृष्टिकोनामुळे लोक त्यांना प्रेमाने **पान २ वर**

# माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे घरफोडी सोन्या,चांदीचे दागिने,रोख रक्कम चोरी!



**लोकनायक वृत्तसेवा माजलगाव**– दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे लोणी -सावंगी बंधाऱ्यावर ऑपरेटर च्या घरात सकाळीच घुसून घरफोडी करुन सोन्या, चांदीचे दागिने व रोख रक्कम मिळुन ६४ हजार रुपयांच्या मुद्देमालाची चोरी झाल्याची घटना घडली. चोरी प्रकरणी मिळालेली माहिती अशी, श्याम नवनाथ खैरे,लोणी-सावंगी उच्चस्तर बंधारा ऑपरेटर रा मंजरथ,ता.मंजरथ यांच्या मंजरथ येथील घरी ३०जून रोजी च्या सकाळी ११ते ११:३०वा.दरम्यान कुणी नसताना अज्ञात चोरट्याने दरवाजाचा कोंडा तोडून आत प्रवेश केला. आणि कपाटातील ७ ग्राम वजानाचे जुने वापरते सोन्याचे झुंबर, २ग्राम वजनाची नाकातील नथ,३ ग्राम वजानाची एक सोन्याची अंगठी असे मिळुन ५४ हजार रु किंमतीची १२ग्राम वजनाची सोन्याची दागिने. तसेच लहान मुलाच्या **पान २ वर**

# संपूर्ण ग्रामविकास हेच वसंतराव नाईक यांचे स्वप्न-डॉ.हनुमंत सौदागर



**लोकनायक वृत्तसेवा** – महाराष्ट्र मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात वसलेला असून जोपर्यंत गावचा विकास होणार नाही. तोपर्यंत महाराष्ट्र विकसित होणार नाही. म्हणूनच संपूर्ण ग्रामविकास हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री जलनायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न असल्याचे प्रतिपादन डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले. ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज येथे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावर बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य विजय शिनगारे, डॉ. नागेश कराळे, ग्रंथपाल अशोक **पान २ वर**

# मैंदवाडी येथे नागरिकाच्या सतर्कतेमुळे वाचले हरणाचे प्राण वनविभागाची ही तात्काळ दखल

**लोकनायक वृत्तसेवा** – तालुक्यातील मैंदवाडी येथे एका हरणाचा कुत्र्यांनी पाठलाग केल्याने ते जखमी झाले होते येथील ग्रामस्थांनी तात्काळ त्याला कुत्र्यापासून वाचवून प्रथोपचार करून वनविभागास याची कल्पना दिली वनविभागाचे पथकही तात्काळ या ठिकाणी पोहोचल्याने या हरणाचा बचाव ग्रामस्थ व वनविभाग यांच्या मदतीमुळे होऊ शकला.

धारूर तालुक्यातील मैंदवाडी येथे मंगळवारी सकाळी कुत्र्यानी पाठलाग केल्याने एक हरीण गावाजवळ आले व ते धावत



असताना खड्ड्यात पडल्याने जखमी झाले नागरिकांना हे हरीण पळताना दिसतात त्यांनी धावत जाऊन कुत्र्यापासून या हरणाचा बचाव केला व वनविभागात तात्काळ कळवले या हरणात त्यांनी प्राथमिक उपचार करून वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी ईश्वर घुनावत यांना कळवले त्यांनी तात्काळ वनविभागाचे कर्मचारी पाठवून या हरणास ताब्यात घेतले व धारूर येथे वनपरिक्षेत्र कार्यालयात आणून त्याच्यावर उपचार करून त्याचा बचाव केले व या हरणाचे प्राण ग्रामस्थ वनविभागाच्या एकत्रितपणे वाचवण्यात यश आले**पान २ वर**

# चनकापुर येथील ३२ वर्षीय तरुण तिन दिवसापासुन बेपत्ता

**लोकनायक वृत्तसेवा** – खापरखेडा परिसरातील चनकापुर मिलन चौक येथे राहणारा तरुण मागील तिन दिवसापासून बेपत्ता झाला आह. बेपत्ता असलेल्या तरुणाचे नाव प्रतिक सुनिल मेश्राम -३२वर्ष रा. मिलन चौक, डॉ. काकडे दवाखान्याचे मागे चनकापुर असे सांगण्यात येते. प्रतिक हा अविवाहित असुन रविवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास घरी कुणालाही न सांगता बेपत्ता झाला. त्याने सोबत एक बॅग नेलेली आहे. रविवारी रात्री उशिरापर्यंत ही घरी आला नसल्याने त्याचा आई वडिलांनी



सर्वत्र नातेवाईक, मित्र मडळीकडे शोधाशोध घेतला पण कुठेही आढळून आला नसुन त्याने सोबत नेलेला मोबाईल सुद्धा बंद असल्याचे सांगण्यात येत आहे. बेपत्ता असलेल्या तरुणाचे वडील फिर्यादी सुनिल मेश्राम हे वेकोलित आहेत. त्यांनी मगळवारी १जूलै रोजी खापरखेडा येथील पोलीस ठाण्यात
फिर्याद दिली आहे. सदर बेपत्ता असलेला तरुण जर कुठेही कुणाला आढळून आल्यास तशी सुचना खापरखेडा पोलीस ठाण्यात द्यावी
असे आव्हान खापरखेडा पोलिसांनी केले.

# पतीनंतर पत्नीचेही निधन-निराधार वृध्देच्या अंत्यविधीसाठी पुन्हा कार्यकर्ते सरसावले



**लोकनायक वृत्तसेवा** – आजच्या 'हायटेक' जमान्यात माणूसकी लुप्त होत असताना धारुर शहरात ६ मे २०२५ रोजी निधन झालेल्या निराधार इसमाच्या वृध्द व अपंग पत्नीचे आज दि.१ जुलै रोजी दुर्दैवी मृत्यू झाल्याचे कळताच त्याच कार्यकर्त्यांनी सदर महिलेच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले. एकीकडे आई वडिलांना पोटच्या सख्ख्या लेकरांन बेवारसपणे सोडून दिलेला लेक तर दुसरीकडे माणूसकी म्हणून धडपडणारे समाजातील कार्यकर्ते असं चित्र धारुर शहरात दिसून आले. दि.६ मे रोजी बेवारस-स्थितीत जगणाऱ्या दाम्पत्यातील इसमाचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या अंत्यविधीसाठी सोनार समाजातील कार्यकर्त्यांनी एकत्र येवून विधिवत अंतिम संस्कार केल्याची घटना दि.६ मंगळवार रोजी धारुर येथे घटली. मुलांनी बेवारस अवस्थेत सोडून दिलेल्या भोसले दाम्पत्य मागील अनेक वर्षापासून सटवाई मंदिर या ठिकाणी वास्तव्य करत होते. या दाम्पत्यास शहरातील वेगवेगळ्या जाती धर्मातील लोकं मदत करत. दोघांपैकी पुरुष अंध तर स्त्री अपंग. त्यामधील सुरेशराव विठ्ठलराव भोसले नामक व्यक्तीचा दि.६ मे मंगळवारी सकाळी निधन झाले. गल्लीतील शेजारी राहणाऱ्या व्यक्तींनी सदर व्यक्तीचा मृत्यू झाल्याची खबर कायाकल्प फांउडेशनचे सदस्य सय्यद शाकेर यांना दिली. त्यांनी सदर प्रकाराची माहिती सुवर्णकार समाजातील सामाजिक कार्यकर्ते अमर महामुनी व माजी नगरसेवक अनंत चिंचाळकर यांना दिल्यानंतर या सामाजिक कार्यकर्त्यांनी तात्काळ याची दखल घेवून संपूर्ण तयारी करत अंत्यविधी केला. मयताच्या नातेवाईकांना संपर्क केला असता त्यांचे पुतणे जितेंद्र भोसले यांनी **पान २ वर**

This Newspaper Printed by Owner , Printer , Publisher **Editor BHARAT DEVIDAS GAIKWAD Chief Editor - Abheejit GAIKWAD** at **Indradhanush Printers and publishers** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra ) and Published AT.**The office of Dainik Loknayak** , Near Post Office , Peth Beed , Khadkpura, Beed 431122 ( Maharashtra )

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक **भारत देविदास गायकवाड,**कार्यकारी-संपादक **अभिजित गायकवाड** यांनी **इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स**, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय, पोस्ट ऑफीसजवळ, पेठ बीड, खडकपुरा, बीड जि.बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले.**निवासी संपादिका सौ .नायरा राज मुळे. पी.आर.बी.कायद्यानुसार ( सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत)** Mobile: 9850165082 / 9420406019 **E:mail : dainikloknayak@gmail.com**